# हवामान आधारीत कृषि सल्ला
## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ए.एम.एफ.यु.,इगतपुरी,
## विभागीय कृषी संशोधन केंद्र, इगतपुरी, जि.नाशिक.

दूरध्वनी : ०२५५३ २४४०३२ ईमेल:igatpuri.amfu@gmail.com

**४९) हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि.२२.०९.२०२६ जिल्हा: नाशिक**

| मागील आठवड्यातील हवामान (१६/०९/२०२६ ते २२/०९/२०२६) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामान अंदाज (२३/०९/२०२६ ते २७/०९/२०२६) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १६ | १७ | १८ | १९ | २० | २१ | २२ | दिनांक | २३ | २४ | २५ | २६ | २७ |
| ६.७ | २.२ | १०.६ | ९.२ | ०.२ | ४०.३ | १.७ | पाऊस (मिमी) | १० | ७ | २ | १ | १ |
| २६.७ | २६.५ | २६.६ | २५.८ | २८.८ | २९.२ | २९.० | कमाल तापमान (अं.से.) | ३२ | ३३ | ३४ | ३४ | ३४ |
| २२.० | २२.७ | २२.७ | २२.० | २१.५ | २१.३ | २३.० | किमान तापमान (अं.से.) | २२ | २१ | २१ | २१ | २२ |
| ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढग स्थिती (आकाश) | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | अं:ढगाळ | अं:ढगाळ |
| ९१ | ९२ | ९४ | ९१ | ९० | ९४ | ९३ | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ९० | ८८ | ८८ | ९० | ८९ |
| ९२ | ८६ | ९५ | ७५ | ७८ | ९० | ८७ | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ८९ | ७९ | ७८ | ८६ | ८७ |
| ६.१ | ३.५ | ५.७ | ३.४ | २.७ | ३.० | २.६ | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | ८ | १० | १० | १७ | २१ |

## हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| **हवामान सारांश** | | पुढील पाच दिवसाचा अंदाज लक्ष्यात घेता नाशिक जिल्ह्यात हलका पाऊस पडण्याची शक्यता आहे. आकाश पुढील पाच दिवस ढगाळ राहिल. कमाल तापमान ३२-३४ डिग्री सें. व किमान तापमान २१-२२ डिग्री सें. दरम्यान राहण्याची शक्यता आहे. तसेच वा-याचा वेग ८-२१ कि.मी/तास या दरम्यान राहण्याची शक्यता आहे. |
| **हवामान सतर्कता/इशारा:** | | **कृषी क्षेत्रावरील प्रभाव आधारित अंदाज (IBF) आणि इशारा लक्षात घेता दि. २२ व २३ सप्टेंबर २०२६ रोजी नाशिक जिल्ह्यात तसेच घाट क्षेत्रात तुरळक ठिकाणी (येलो अलर्ट) मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट, हलका ते मध्यम पाऊस व सोसाट्याचा वारा (३०-४० किमी प्रती तास) वेगाने वाहण्याची अधिक शक्यता आहे. (२२.०९.२०२६ रोजी आरएमसी मुंबईव्दारे जारी केलेल्या जिल्हास्तरीय अंदाज आणि चेतावणीवर आधारित).** |
| **सामान्य सल्ला** | | विजेचा पूर्वानुमाना करीता दामिनी मोबाईल ॲपचा वापर करावा किंवा हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला, हवामान सतर्कता/इशारा जसे कि चक्रीवादळे, मुसळधार पाऊस, गारपीठ व विजांसाठी मौसम मोबाईल ॲपचा उपयोग करावा.<br>इशारा लक्ष्यात घेता सोसाट्याचा वाऱ्यापासून होणाऱ्या संभाव्य नुकसान टाळण्याकरीता उपायोजना (पिकांना काठींचा आधार किंवा दोरीने बांधणे, झाड किंवा प्रतिबंधक झाडी इ.) कराव्यात. जसे कि नवीन लावलेले फळझाडे, वेलवर्गीय भाजीपाला पिकांना बांबू किंवा काठी च्या सहाय्याने आधार द्यावा.<br>पावसाचा अंदाज लक्ष्यात घेता काढणी केलेल्या मुग व उडीद पिकांची सुरक्षित ठिकाणी साठवणुक करावी.<br>मुग व उडीद: शेंगा वाळल्यावर कापणी करून खळ्यावर आणून त्याची मळणी करावी. शेंगा खळ्यावर चांगल्या वाळविल्यावर काठीच्या सहाय्याने झोडपून दाणे वेगळे करावेत. साठवणीपुर्वी मुग व उडीद ५ ते ६ दिवस उन्हात वाळवुन पोत्यात किंवा कोठीत साठवावे. साठवण कोंदट किंवा ओलसर जागेत करू नये. शक्य झाल्यास धान्यास १ टक्का करंज किंवा एरंडीचे तेल चोळावे किंवा कडुनिंबाचा पाला (५ टक्के) धान्यात मिसळून धान्य साठवावे. यामुळे धान्य साठवणुकीतील किडींपासून उडीदाचे संरक्षण होते. |
| **संदेश** | | **हवामान सतर्कता / इशारा लक्ष्यात घेता पशुधन, कुक्कुट पक्षी आणि स्वतःचे मेघगर्जनेसह विजांच्या कडकडाटपासून संरक्षण करा. (मेघदुत व दामिनी मोबाईल ॲपचा उपयोग करावा.)** |
| **भात** | अधिक फुटवे फुटण्याची-पोटरी /फुलोरा अवस्था | भात सदृश्य तणाची भेसळ फुलोऱ्यावर येताच लगेच काढावी जेणेकरून त्याचे दाणे खडून इतर स्वच्छ भात प्रक्षेत्रावर होणारा प्रसार थांबवता येईल.<br>पाणी व्यवस्थापन :<br>भात खाचरात पिकाच्या योग्य वाढीसाठी भात खाचरात अधिक फुटव्याच्या अवस्थेत पाण्याची पातळी ३ ते ५ सेमी असावी. तसेच भात पोटरीच्या अवस्थतेत पाण्याची पातळी ५-१० सेमी असावी.<br>उशिरा वाढलेली तणे काढून शेत स्वच्छ ठेवावे, जेणेकरून अन्नद्रव्यांची स्पर्धा कमी होईल. |
| **नाचणी/नागली व वरई** | फुटवे फुटण्याची-पोटरी /फुलोरा अवस्था | लष्करी अळी व पाने खाणारी अळी : खरीपात ३० ते ८० टक्के नुकसान. गवताळ-डोंगरी भागात जास्त प्रादुर्भाव, बंदोबस्त: नाचणी पिकावरील पाने खाणारी अळीसाठी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून बांधावरील गवत व तण उपटून नष्ट करावे. |
| **मका** | वाढीची अवस्था - फुलोरा व कणीस लागण अवस्था | मका पिकावरील अमेरिकन लष्करी अळीच्या नियंत्रणासाठी इमामेक्टीन बेन्झोएट@ ४ ग्राम प्रती १० लि. पाण्यात **किंवा** थायोमेथोक्झाम + ल्याम्बडा सायहेलोथ्रीन@ ३ मिली प्रती १० लि. पाण्यात मिसळून फवारणी करावी.<br>मका पिकास नत्र, स्फुरद, पालाश आणि गंधक या बरोबरच जस्त या अन्नद्रव्याचा वापर करणे पीक पोषणाच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरते.<br>(पावसाचा अंदाज लक्ष्यात घेता स्वच्छ हवामानात वरील सर्व कामे पूर्ण करावीत.) |
| **सोयाबीन** | शेंगा भरण्याच्या अवस्था | सोयाबीनवरील हेलीकोव्हर्पा, उंट अळी व तंबाखूवरील पाने खाणाऱ्या अळीचा नियंत्रणासाठी, कामगंध सापळे एकरी ३ लावावेत. त्वरित फुले सुपर बायोमिक्स @ १० मिली / लिटर किंवा क्विनालफॉस (०.२ %) किंवा प्रोफेनोफॉस (०.२ %) २ मिली प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.<br>(पावसाचा अंदाज लक्ष्यात घेता स्वच्छ हवामानात वरील सर्व कामे पूर्ण करावीत.) |
| **भुईमुग** | फुलोरा / आऱ्या सुटणे अवस्था | खरीप भुईमुगास फुले येण्याची अवस्था (पेरणीनंतर २५ ते ३० दिवस ), आऱ्या सुटण्याची अवस्था (३५ ते ४५ दिवस) आणि शेंगा पोसण्याची अवस्था (६५ ते ७० दिवस) या अवस्थांमध्ये पावसाने ताण दिल्यास संरक्षित पाण्याची पाळी द्यावी. नंतर जमिनीच्या मगदुराप्रमाणे ८ ते १० दिवसाचे अंतराने १० ते १२ वेळा पाण्याच्या पाळ्या द्याव्यात. |
| **बाजरी** | फुलोरा अवस्था | दोन वेळा कोळपणी आणि गरजेनुसार एक ते दोन वेळा खुरपणी करावी. एकात्मिक तण नियंत्रण पद्धतीमध्ये ॲट्राझिन तणनाशकाची १.० किलो प्रति हेक्टरी पेरणीनंतर परंतु पीक व तण उगवण्यापूर्वी ५०० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी व एक खुरपणी पेरणीनंतर २५- ३० दिवसांच्या आत करावी. |
| **द्राक्ष** | | ज्या बागेमध्ये मिलीबगचा प्रादुर्भाव दरवर्षी दिसतो, त्या बागेत छाटणीपूर्व काळात खोड साफ करून मिलीबगचे नियंत्रण करून घेणे महत्त्वाचे आहे. सर्वसाधारणपणे काढणीच्या वेळेस मिलीबग वाढतात, त्यावेळेस फवारणी घेतल्यास त्यांचे उर्वरित अंश द्राक्षामध्ये आढळून येतात. हे टाळण्यासाठी मिलीबग आतापासूनच नियंत्रणात ठेवणे फायद्याचे राहते. फवारणी करावी. |
| **डाळिंब** | | हस्त बहार – सप्टेंबर–ऑक्टोबर पीक नियमन<br>बागेची अवस्था: ताण सोडणे<br>अन्नद्रव्य व्यवस्थापन :<br>प्रति झाड २५–३० किलो शेणखत, किंवा १५–२० किलो शेणखत + २ किलो गांडूळखत + २ किलो निंबोळी पेंड, किंवा ७.५ किलो चांगले कुजलेले कोंबडी खत + २ किलो निंबोळी पेंड द्यावे.<br>अझोस्पिरिलम स्पेसिज, ॲस्परजिलस नायजर, ट्रायकोडर्मा व्हिरिडी आणि पेनिसिलिअम पिनोफायलम यापैकी एक/अधिक जैविक फॉर्म्युलेशन चांगल्या कुजलेल्या शेणखतात १:२५ प्रमाणात मिसळावे. मिश्रण सावलीत बेड तयार करून १५ दिवस ६०–७०% ओलावा ठेवावा व दर दोन दिवसांनी उलथापालथ करावी. वापरण्यापूर्वी अर्बास्कूलर मायकोरायझा बुरशी (एएमएफ) – रायझोफॅगस इरेगुल्यारिस किंवा ग्लोमस इंट्राडॉलिसिस हे जैविक फॉर्म्युलेशन १०–१५ ग्रॅम प्रति झाड मिसळावे. तयार मिश्रण १०–१५ ग्रॅम प्रति झाड प्रमाणात बागेत द्यावे. (पावसाचा अंदाज लक्ष्यात घेता स्वच्छ हवामानात वरील सर्व कामे पूर्ण करावीत.) |

# हवामान आधारीत कृषि सल्ला
## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ए.एम.एफ.यु.,इगतपुरी,
## विभागीय कृषी संशोधन केंद्र, इगतपुरी, जि.नाशिक.

दूरध्वनी : ०२५५३ २४४०३२ ईमेल:igatpuri.amfu@gmail.com

| | | |
|---|---|---|
| **आंबा** | | नवीन लागवड केलेल्या बागेतील कीड-रोग नियंत्रण<br>नवीन लागवड असलेल्या झाडांचे हुमणी किंवा वाळवी यांचा प्रादुर्भाव होऊन नुकसान होते. या किडींपासून संरक्षण व्हावे, यासाठी सप्टेंबर-ऑक्टोबर या काळात झाडाच्या मुळांच्या परीघामध्ये क्लोरपायरीफॉस (२० ईसी) ३ मिली प्रति लिटर पाणी या प्रमाणे आळवणी करावी.<br>बागेत सप्टेंबरमध्ये नवती येण्यास सुरुवात होते. अशा नवीन पालवीवर पाने खाणारी अळी, रस शोषक किडी, शेंडे अळी, करपा रोग आणि मालफॉर्मेशन यांसारख्या दुर्धर रोगांपासून काळजीपूर्वक संरक्षण करावे. (पावसाचा अंदाज लक्ष्यात घेता स्वच्छ हवामानात वरील सर्व कामे पूर्ण करावीत.) |
| **खरीप कांदा** | रोपवाटिका व्यवस्थापन | रोपवाटिकेत ठिबक किंवा तुषार सिंचन पद्धती वापरण्यासाठी जमिनीपासून १० ते १५ सें.मी. उंच, १ ते १.२ मीटर रुंद आणि गरजेनुसार लांब गादीवाफे जमिनीच्या उताराला आडवे तयार करावेत. त्यामुळे रोपांची वाढ एकसारखी होते. पाणी फार काळ साचून राहत नाही, त्यामुळे रोपे कुजत किंवा सडत नाहीत. तसेच लावणीच्या वेळी रोपे सहज उपटून काढता येतात. रोपांच्या गाठी जाड व लवकर तयार होतात. वाफे तयार करताना १६०० ग्रॅम नत्र, ४०० ग्रॅम स्फुरद, ४०० ग्रॅम पालाश प्रति २०० वर्ग मीटर याप्रमाणात खते द्यावीत. रुंदीशी समांतर ५-७.५ सें.मी. अंतरावर रेघा पाडून १-१.५ सें.मी. खोलीवर बियाणे पेरावे. पेरणीनंतर चांगले कुजलेले शेणखत किंवा कंपोस्ट खताने बियाणे झाकावे. नंतर झारीने जेमतेम वाफ्यावर फिरेल अशा पद्धतीने पाणी द्यावे. तण नियंत्रणासाठी रोपे उगवण्यापूर्वी वाफ्यावर पेंडीमिथॅलीन २ मि.लि. प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. पेरणीनंतर २० दिवसांनी हाताने खुरपणी करून, ८०० ग्रॅम प्रति २०० वर्ग मीटर या प्रमाणात नत्र द्यावे.<br>पुनर्लागवड रांगडा कांदा लागवड ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यात पुर्ण करावी.<br>कांदा पिकाची पुनर्लागवड करताना रोपांची मुळे फुले सुपर बायोमिक्स १०० मिली प्रती १० लिटर पाणी द्रावणात किंवा डायथेन ४५@ २.५ ग्राम किंवा कार्बेन्डॅझिम १ ग्राम प्रति लिटर पाणी द्रावणात बुडवावे. |
| **टोमॅटो** | | रब्बी टोमॅटो रोपवाटिका<br>रब्बी हंगामासाठी सप्टेंबर–ऑक्टोबरमध्ये रोपवाटिका तयार करून ऑक्टोबर–नोव्हेंबरमध्ये पुनर्लागवड करावी.<br>एक एकरासाठी सरळ वाण १६० ग्रॅम व संकरित वाण ५० ग्रॅम बियाणे पुरेसे आहे.<br>बियाण्यास थायरम/कॅप्टन ३ ग्रॅम किंवा ट्रायकोडर्मा २.५ ग्रॅम + अॅझोटोबॅक्टर २.५ ग्रॅम प्रति किलो या प्रमाणात बीजप्रक्रिया करावी.<br>एक एकरासाठी सुमारे १.२ गुंठे रोपवाटिका पुरेशी असून ३ × १ मीटर, १५ सें.मी. उंचीचे गादीवाफे तयार करावेत.<br>प्रति गादीवाफा ५ किलो कुजलेले शेणखत + १९:१९:१९ (८० ग्रॅम) किंवा १५:१५:१५ (१०० ग्रॅम) + २०० ग्रॅम निंबोळी पेंड + ५० ग्रॅम ट्रायकोडर्मा मिसळावे.<br>१० सें.मी. अंतरावर ओळी व १ सें.मी. अंतरावर बी पेरावे. उगवणीपर्यंत हलके पाणी द्यावे व पाणी साचणार नाही याची काळजी घ्यावी.<br>रोपे उगवल्यानंतर ६०–१०० मेश नायलॉन नेटने झाकून संरक्षण करावे.<br>साधारण २५–३० दिवसांत रोपे पुनर्लागवडीसाठी तयार होतात. |
| **पशुधन (गाय व म्हैस)** | | विजांचा कडकडाट अंदाज लक्ष्यात घेता जनावरांना मोकळ्या जागेत, झाडाखाली, तलाव, नदी किंवा इतर जलस्रोतांजवळ ठेवू नये.<br>जनावरे, गुरे व शेळ्यांना गोठा/शेड किंवा मजबूत सुरक्षित ठिकाणी हलवावे आणि शेतातील कामकाज थांबवावे.<br>पशुधन व कुक्कुट पक्ष्यांना पाऊस व विजेपासून सुरक्षित ठेवावे आणि अनावश्यकपणे बाहेर नेऊ नये.<br>पशुखाद्य, चारा व कडबा प्लास्टिक/ताडपत्रीने झाकून सुरक्षित ठेवावा.<br>गोठा कोरडा ठेवण्यासाठी चुन्याचा वापर करावा; धातूच्या छत व भिंती टाळाव्यात.<br>जनावरांना ट्रॅक्टर, धातूची शेती अवजारे व पाण्यापासून दूर ठेवावे. जनावरे पाण्यात असल्यास तात्काळ बाहेर काढावे.<br>पावसाळी व विजेच्या वातावरणात जनावरांवर सतत लक्ष ठेवून त्यांना सुरक्षित ठिकाणी ठेवावे. |
| **शेळी** | | आरोग्य व्यवस्थापन<br>शेळ्यांना पावसाळ्याअगोदर व पावसाळ्यानंतर पशुवैद्यकाच्या सल्ल्याने वेळापत्रकानुसार लाळ्या खुरकूत, आंत्रविषार, घटसर्प व पीपीआर या रोगांच्या प्रतिबंधक लसी देऊन घेणे आवश्यक आहे.<br>मे व सप्टेंबर महिन्यात शेळ्यांना त्यांच्या वजनानुसार जंतनाशकाची योग्य मात्रा देऊन जंत निर्मूलन करून घ्यावे. ढगाळ व दमट हवामान जंतांच्या वाढीसाठी पोषक असते.<br>शेळ्यांना लस कधीही रोग आल्यानंतर देऊ नये, कारण आजारी व विशिष्ट रोगाच्या साथीमध्ये रोग झालेल्या शेळीला लस दिल्यास तो रोग बरा न होता बळावतो.<br>पावसाळ्यामध्ये जखमांवर माश्या बसून त्या चिघळणार नाही, याची काळजी घ्यावी व माश्यांचा आवश्यक तो बंदोबस्त करावा. यासाठी कडुनिंब, निरगुडी किंवा करंज पाला यांचा वापर करून शेडचे निर्जंतुकीकरण करावे. |
| **मेंढी** | सप्टेंबरमधील मेंढ्यांतील | जनावरांचा गोठा कोरडा ठेवण्यासाठी चुन्याचा वापर करावा.<br>या महिन्यामध्ये मेंढ्या विण्याचे प्रमाण जास्त असते. गाभण मेंढ्यांची विशेष काळजी घ्यावी.<br>व्यायलेल्या मेंढ्या व नवजात कोकरांची योग्य निगा राखावी.<br>मेंढ्या व्यायल्यानंतर वाडा गरम पाण्याने स्वच्छ करून घ्यावा.<br>जन्मानंतर १ तासाच्या आत कोकरांना चिक पाजावा.<br>दूध देणाऱ्या मेंढ्यांना प्रती मेंढी ४०० ग्रॅम पशुखाद्य खाऊ घालावे.<br>माजावर आलेल्या मेंढ्या ओळखून कळपामध्ये मेंढा नर सोडावा. |
| **कुक्कुटपालन** | | परसबागेतील कोंबड्यांमध्ये गोलकृमी (अस्कॅरीडीया गॅली) व पट्टकृमी (रॅलीटीना) यांचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता जास्त असते. कृमींचा प्रादुर्भाव सहज लक्षात येत नसल्याने पशुवैद्यकांच्या सल्ल्याने ठराविक कालावधीनंतर जंतनाशकाची मात्रा पाणी किंवा खाद्यातून द्यावी. कोंबडी पिलांना १ ते ३ महिन्यांच्या काळात दोन वेळा, तर मोठ्या कोंबड्यांना विशेषतः पावसाळ्यात १–२ वेळा कृमीनाशक द्यावे. यामुळे कृमींचा प्रादुर्भाव कमी होऊन कोंबड्यांचे वजन व अंडी उत्पादन वाढण्यास मदत होते. |

**स्त्रोत:**

१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र,मुंबई.

२) मागील हवामान: ग्रामीण कृषि मौसम विभाग वेधशाळा विभागीय कृषी संशोधन केंद्र, इगतपुरी, जि. नाशिक.

**ठिकाण** : विकृसंके,इगतपुरी

**दिनांक** : १८.०९.२०२६

**स्वाक्षरीत/-**
**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, इगतपुरी**
**तथा सहयोगी संशोधन संचालक,**
**वि.कृ.सं.के., इगतपुरी, जि. नाशिक**